# जपानी पुष्परचना - भाग २

यावेळी जपानी पुष्परचनेबद्दल आपण आणखी थोडी माहिती घेऊया. पुष्परचना करायची म्हणजे खूप फुले, पाने, पुष्पपात्र असे खूप काही जमवावे लागते असे वाटेल. पण अगदी आपल्या घराच्या बागेतील एखादे फुल किंवा पाने कधी एखाद्या प्रकारचे गवत, वाळलेल्या काड्या, मुळे, वाळलेल्या शेंगा, झाडाचे खोड, वाळलेली पाने-फुले असे काहीही वापरून सुंदर रचना करता येतात. नुसती वेगवेगळ्या रंगाच्या छटा असलेली पाने वापरून सुद्धा रचना करता येते.




या लेखासोबत दोन रचना आहेत. दोन्हीमध्ये बांबूच्या खोडाची उंची कमी जास्त आहे. यामध्ये पहिल्या रचनेमध्ये सदाफुलीची फुले वापरली आहेत.  एरवी सदाफुलीला कडू वास असतो. म्हणून आपण देवाला वाहत नाही किंवा या झाडाकडे दुर्लक्षच करतो. पण या बांबूच्या रचनेमध्ये हि सदाफुली छान शोभून दिसते आहे. त्याचबरोबर बांबूंच्याच अगदी नाजूक वाळलेल्या काड्या प्रत्येक खोडामध्ये वेगवेगळ्या उंचीच्या लावलेल्या

आहेत. या रचनेचे वैशिष्ठ्य म्हणजे फुले व बांबूच्या काड्या वेगवेगळ्या उंचीवर असल्यामुळे रचना छान दिसत आहे. तीन बांबूची खोडे म्हणजे जणूकाही आई-वडील आणि मूल असे कुटुंब एकत्र उभे आहे.




दुसऱ्या रचनेमध्ये तीन बांबूंची खोडे वापरलेली आहेत. पण यात फुले नाहीत त्याऐवजी Song of India ( Variegated ) च्या फांद्या वापरल्या आहेत, याच्या पानावर हिरवा व पिवळा रंग व बांबूचे खोडही हिरवे ! त्यामुळे यात फुले नसली तरी डौलदार फांद्या आणि हिरवी - पिवळी रंगसंगती बघताना वेगळीच मजा येते आहे. यातही बांबूच्या वाळलेल्या काड्या रचनेचे सौंदर्य वाढवायला मदत करतात.

या लेखातील माहिती वाचून तुम्हीही छोट्या सोप्या रचना करून पाहू शकता. बांबूची खोडे नसतील तर वेगवेगळ्या उंचीच्या काचेच्या बाटल्या किंवा बाटलीच्या भोवती कागद गुंडाळून वेगवेगळ्या रंगात पुष्पपात्र तयार करता येईल.

२, ३, ५ अश्या कितीही बाटल्या अथवा या प्रकारचे पुष्पपात्र तयार करून त्यात रचना करता येईल तुम्ही प्रयत्न करून बघा व तुमचा अनुभव व अभिप्राय जरूर कळवा.

धन्यवाद

**सौ. अरुंधती शिरीष देशपांडे**

( M.Sc. M.Phil Chemistry )

व्हाईस प्रेसिडेंट इकेनोबो इकेबाना, पुणे शाखा

email :– asdssd@gmail.com